महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

जा.क्र. : काऔसंवि/ब/कर्कनिस/४९ वी बैठक/३६४१८

दिनांक : ०२.१२.२०१०

# परिपत्रक

विषय : कर्मचारी कल्याण निधी समिती च्या ४९ व्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय.

*************

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीची ४९ वी बैठक दिनांक १४.१०.२०१० रोजी प्रकाशगड, वांद्रे (पू), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१) कर्मचाऱ्यांच्या पाल्यांने पदवीका अभ्यासक्रमात प्रवेश घेतला असेल अशा पाल्यांना शिष्यवृत्ती पदवीकेपर्यंतच देण्यात येते. जर कर्मचाऱ्याच्या पाल्याने पदविकेनंतर पदवी अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतला तर त्यांना पदवी पूर्ण होईपर्यंत शिष्यवृत्ती देण्यात येईल. सदर शिष्यवृत्ती ही पदविका अभ्यासक्रमाकरीता रु. २००/- दरमहा पदविका पूर्ण होईपर्यंत मिळेल. तसेच पदविकेनंतर पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतला तर सदर पाल्यांना शिष्यवृत्ती पदवी अभ्यासक्रमात प्रवेश घेतल्यापासून पदवी पूर्ण होईपर्यंत रु. ४००/- दरमहा याप्रमाणे देण्यात यावी. सदर निर्णय सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून अंमलात आणण्यात येईल.

२) कर्मचाऱ्यांच्या पाल्याने पुढील वर्षात प्रवेश घेतला असेल, परंतु शिष्यवृत्ती पुढे सलगपणे चालू राहण्यासाठी काही संयुक्तीक कारणास्तव अर्ज सादर करु शकला नाही, तर फक्त त्याच वर्षापुरती शिष्यवृत्ती नामंजूर करण्यात येईल व त्यापुढील वर्षात कर्मचारी / पाल्याने अर्ज सादर केल्यास शिष्यवृत्ती मंजूर करण्यात यावी. सदर निर्णय सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून अंमलात आणण्यात येईल.

३) शिष्यवृत्ती मिळण्यासाठी प्रपत्र 'अ' भरताना कर्मचाऱ्यांचे पाल्य मागासप्रवर्गात मोडत असल्यास पाल्यांच्या जातीच्या जात वैधता प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडण्याची अट शिथिल करुन फक्त पाल्याच्या जातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत आणि कर्मचाऱ्याचे जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडल्यास शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल हा निर्णय सन २०१०-११ या शैक्षणिक सालापासून अंमलात आणण्यात येईल.

४) सन २०१०-११ या शैक्षणिक सालापासून कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचे शिष्यवृत्तीचे धनादेश फक्त कर्मचाऱ्यांच्या नावानेच देण्यात येईल. (कर्मचारी पाल्यांच्या नावाने धनादेश देण्यात येऊ नयेत.)

५) कर्मचारी कल्याण निधी समितीचे परिपत्रक क्र. ६१०० दि. ०३/०२/२००४ अन्वये विहीत केलेल्या एकूण ३१ आजारांच्या व्यतिरिक्त खालील प्रमाणे ८ आजारांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| 1) Kidney stone operation /ureteric Colic | Rs. 20,000/- |
| 2) Nosal polip DNS | Rs. 10,000/- |
| 3) T.B. (आर्थिक मदत फक्त एकदा मिळेल) | Rs 10,000/- |
| 4) Appendicitis Operation only | Rs 20,000/- |
| 5) Asthma, Acute bronchitis/exacerbation /COPD (Hospital Admission only) | Rs 10,000/- |
| 6) Fissure/piles operation | Rs 10,000/- |
| 7) Traucoma operation | Rs 10,000/- |
| 8) Hernia/Prostate operation | Rs. 20,000/- |

६) "गुणवंत कामगार पुरस्कार" तसेच "राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर विविध क्षेत्रात प्राविण्य प्राप्त केल्यामुळे दिले जाणारे पुरस्कार" कंपनीच्या सेवेत असताना कंपनीच्या अधिकारी / कर्मचारी यांनी प्राप्त केले तर त्यांना विशेष रोख पारितोषीक देण्यात येतात त्या रकमेत खालील प्रमाणे वाढ करण्यात आली आहे हा निर्णय सन २०१०-११ सालापासून अंमलात आणण्यात येईल.

| अ. क्र. | पुरस्काराचे नाव | मंजूर करण्यात आलेली रोख पारितोषिकाची रक्कम |
|---|---|---|
| १. | गुणवंत कामगार पुरस्कार | रु २५,०१/- |
| २. | राज्य पातळीवरील पुरस्कार | रु.११,०००/- |
| ३. | राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार | रु. १५,०००/- |

७) राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये भाग घेवून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक (सुवर्णपदक, रौप्यपदक व कास्यपदक) मिळविणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना जी रोख पारितोषीके (वैयक्तिक व सांघिक स्पर्धेसाठी) देण्यात येतात त्या रकमेत खालील प्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे हा निर्णय सन २०१०-११ सालापासून अंमलात आणण्यात येईल.

| अ. क्र. | पुरस्काराचे नाव | मंजूर करण्यात आलेली रोख पारितोषिकाची रक्कम |
|---|---|---|
| | **वैयक्तिक स्पर्धेत प्राविण्य:** | |
| १. | प्रथम क्रमांक (सुवर्णपदक) | रु.६,०००/- |
| २. | द्वितीय क्रमांक (रौप्य पदक) | रु.४,०००/- |
| ३. | तृतिय क्रमांक (कास्य पदक) | रु.२,०००/- |
| | **सांघिक स्पर्धेत प्राविण्य:** | |
| १. | प्रथम क्रमांक (सुवर्णपदक) | रु.६,०००/- |
| २. | द्वितीय क्रमांक (रौप्य पदक) | रु.४,०००/- |
| ३. | तृतिय क्रमांक (कास्य पदक) | रु.२,०००/- |

किशोर पवार

सदस्य / सचिव, क.क.नि.समिती तथा
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत सविनय सादर :
कार्यकारी संचालक (मासं), महावितरण / महानिर्मिती / महापारेषण.

प्रत सस्नेह :
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती / महापारेषण
-- आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या कंपनी अंतर्गत उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करावी.

प्रत :
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.

D:old d drive madhuri-Bhegale-49 bathak karyavrutant.doc